महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १६२ वे | दिनांक : ०७/०६/२०२६ | वार : रविवार

# 'कॉकरोच जनता पार्टी'वर मुनगंटीवारांचा हल्लाबोल



**मुंबई :** चंद्रपूरमध्ये बोलताना भाजपचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनावर तसेच विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या राजकीय चर्चांवर सविस्तर भाष्य केले. नीट परीक्षा प्रकरणावरून दिल्लीतील जंतरमंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनामुळे या पक्षाची चर्चा देशभर होत असताना मुनगंटीवार यांनी सामान्य नागरिकांच्या भावना दुखावणाऱ्या वक्तव्यांमधूनच अशा प्रकारच्या चळवळी निर्माण होतात, असे मत व्यक्त केले. सर्वोच्च न्यायालयात किंवा सार्वजनिक जीवनात बोलताना शब्दांचा वापर अत्यंत जबाबदारीने झाला पाहिजे, अन्यथा तरुणांच्या मनात असंतोष निर्माण होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले.

कॉकरोच जनता पार्टीच्या उदयाबाबत बोलताना मुनगंटीवार म्हणाले की, देशातील तरुणांना कमी लेखणारी किंवा त्यांची तुलना अपमानास्पद शब्दांशी करणारी भाषा वापरली गेल्यास त्याची प्रतिक्रिया समाजात उमटते. अशाच भावना तरुणांच्या मनात निर्माण झाल्यामुळे या नव्या प्रयोगाचा जन्म झाला आहे. मात्र केवळ आंदोलन किंवा नाराजी यावर पर्याय उभा राहत नाही. त्यासाठी मजबूत संघटनात्मक रचना, विचारसरणी आणि कार्यपद्धती आवश्यक असते. भाजपने त्याग, तपस्या आणि बलिदानाच्या आधारावर आपली उभारणी केली आहे. त्यामुळे अशा नव्या प्रयोगांना राजकीय पर्याय म्हणणे योग्य ठरणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी पुन्हा एकदा सर्वांना शब्दांची काळजी घेण्याचा सल्ला दिला. सामान्य माणसाच्या भावना दुखावतील अशी भाषा सार्वजनिक मंचावर वापरणे टाळले पाहिजे, असे ते म्हणाले. एखाद्या वक्तव्यामुळे लोकांच्या मनात असंतोष निर्माण झाला तर त्यातून नवीन प्रकारच्या चळवळी उभ्या राहतात. त्यामुळे समाजातील सर्व घटकांनी जबाबदारीने वागण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. सीजेपीच्या प्रयोगातून सर्वांनी धडा घ्यावा आणि अशा परिस्थितीला कारणीभूत ठरणारी वक्तव्ये टाळावीत, असेही त्यांनी सांगितले.

विधान परिषद निवडणुकीदरम्यान काँग्रेसच्या नगरसेवकांना प्रत्येकी ५ लाख रुपये वाटल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला होता. या आरोपावर प्रतिक्रिया देताना मुनगंटीवार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनाचा संदर्भ दिला. शिवाजी महाराजांनी निष्ठा आणि मूल्यांची शिकवण दिली होती. जर कार्यकर्ते पैशासाठी प्रभावित होत असतील तर त्यांना निष्ठेचे धडे कोणी द्यायचे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. भाजपच्या कार्यकर्त्यांना कोणत्याही प्रलोभनाने विचलित करता येत नाही, असा दावा करत त्यांनी सर्व पक्षांनी आपल्या कार्यकर्त्यांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना रुजवली पाहिजे, असे मत व्यक्त केले.

आचारसंहितेवर बोलताना मात्र मुनगंटीवार यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. विधान परिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे सामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर बैठका घेणेही कठीण झाले असल्याचे त्यांनी सांगितले. आचारसंहिता म्हणजे जणू 'शोले' चित्रपटातील नवा गब्बरसिंग असल्याची उपमा देत त्यांनी टीका केली. नगरसेवक हे विशिष्ट पक्षांशी बांधील असताना सामान्य लोकांच्या कामांवर निर्बंध आणण्याचे कारण काय, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. अशा प्रकारे आचारसंहितेचा अतिरेक झाला तर जनतेतूनही कधीतरी 'जय-वीरू' तयार होतील, असा इशाराही त्यांनी दिला.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# निदा खान प्रकरणावरून शिरसाट आक्रमक



**छत्रपती संभाजीनगर :** महाविकास आघाडीच्या नेत्यांवर अत्यंत तिखट शब्दांत प्रहार शिवसेना (शिंदे गट) प्रवक्ते आणि आमदार संजय शिरसाट यांनी विविध राजकीय घडामोडींवरून केला आहे. छत्रपती संभाजीनगरमधील कथित धर्मांतर आणि फसवणुकीच्या प्रकरणाचा संदर्भ देत शिरसाट म्हणाले की, 'निदा खान प्रकरण' हे केवळ नाशिकपुरते मर्यादित नसून त्याचे धागेदोरे संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेले आहेत, हे मी पहिल्या दिवसापासून सांगत आहे आणि आता त्याचा प्रत्यय येत आहे.

संजय शिरसाट म्हणाले की, पुणे आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये अशी गंभीर प्रकरणे समोर आली असून प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. संभाजीनगरमधील घटनेत एक विवाहित महिला आपली दोन मुले आणि पतीला सोडून एका व्यक्तीच्या नादी लागते, तिला मुस्लिम धर्म स्वीकारण्यास भाग पाडले जाते, असे धक्कादायक प्रकार शहरात सुरू आहेत. पोलिसांनी इतर गोष्टींपेक्षा अशा संवेदनशील विषयांवर अधिक लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे, अन्यथा यामुळे दोन समाजांत तेढ निर्माण होऊ शकते. शहरातील अनेक महिला गायब झाल्या असून पोलिसांनी या प्रकारांचा गांभीर्याने तपास करावा, अशी मागणी त्यांनी केली.

संजय राऊत आणि राज ठाकरे यांच्या कथित भेटीवर बोलताना शिरसाट यांनी संजय राऊत यांच्यावर खोचक टीका केली. निवडणूक मतपत्रिकेवर व्हावी, ही भूमिका मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी खूप आधीच जाहीर केली होती. त्यामुळे हा निरोप घेण्यासाठी किंवा देण्यासाठी राऊत त्यांची भेट घेतील, यात मला काही तथ्य वाटत नाही. कदाचित उबाठा पक्षाच्या अंतर्गत तक्रारी करण्यासाठीच राऊत राज ठाकरेंच्या भेटीला गेले असावेत. संजय राऊत यांनी कोणावरही आरोप करण्यापूर्वी स्वतःच्या पक्षाच्या परिस्थितीकडे आणि 'आपल्या बुडाखाली काय जळतंय' याकडे आधी पाहावे, असा टोला त्यांनी लगावला.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी विधान परिषद निवडणुकीवरून केलेल्या वादग्रस्त विधानाचा शिरसाट यांनी तीव्र शब्दांत निषेध केला. निवडणुकीत उमेदवार विकले गेल्याचा आरोप करताना वडेट्टीवारांनी राजकारणाची तुलना 'वेश्ये'शी केली होती. यावर आक्षेप घेत शिरसाट म्हणाले की, इतकी वर्षे सोबत काम करणाऱ्या स्वतःच्याच कार्यकर्त्यांना अशा शब्दांत संबोधणे अतिशय चुकीचे आणि गैर आहे. सत्तेसाठी कोणत्याही तडजोडी करणाऱ्या महाविकास आघाडीकडे आता कार्यकर्ते टिकत नसल्याने, नेत्यांचे स्वतःच्या बोलण्यावरील भान सुटले आहे. २०१९ मध्ये जेव्हा 'उबाठा' पक्ष काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत गेला, तेव्हा तुम्हाला कोणत्या नावाने हाक मारायला हवी होती? त्यावेळी जर कोणी तुम्हाला या शब्दांत टोकले असते तर कसे वाटले असते, असा सवाल त्यांनी केला. पक्षाकडे पुरेसे संख्याबळ नसल्याने जर एखाद्या कार्यकर्त्याने निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला, तर त्याला दोष देणे चुकीचे असून अशा नेत्यांसोबत कार्यकर्त्यांनी न राहिलेलेच बरे, असेही ते म्हणाले.

संजय शिरसाट म्हणाले की, महाराष्ट्रात विधान परिषदेच्या निवडणुका सुरू असताना वडेट्टीवार थेट देशाच्या पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांवर कारवाईची मागणी करत आहेत, यावरून त्यांची मानसिक स्थिती बिघडली असून त्यांच्यावर वेड्याच्या रुग्णालयात उपचार करण्याची वेळ आली आहे, अशी घणाघाती टीका शिरसाट यांनी केली. त्यामुळे वडेट्टीवारांच्या अशा वक्तव्यांना आपण अजिबात गांभीर्याने घेत नाही, असे सांगत त्यांनी या विषयावर पडदा टाकला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०७ जून २०२६


## शेतात आई वडिलांच्या हस्ते अलकनंदा घुगे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



**कन्नड (शिवाजी हुसे) :** पर्यावरण दिनाचे औचित्य साधून जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील नालेवाडी या छोट्या गावात काल, दि. ५ जून २०२६ रोजी एक आगळा वेगळा प्रकाशन सोहळा पार पडला. शहरातील थाटामाटाचा सोहळा न करता, साहित्यिकांच्या मांदियाळीऐवजी शेतकरी कुटुंबाच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.तिफण सखी मंचच्या सदस्या, लेखिका व कवयित्री अलकनंदा घुगे यांच्या दुसऱ्या कवितासंग्रह "पाऊस आणि बरंच काही" आणि कथासंग्रह "अर्धा कोयता" याच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन त्यांच्या जन्मगावी, स्वतःच्या शेतात करण्यात आले. या सोहळ्याची खासियत म्हणजे प्रकाशनासाठी व्यासपीठावर साहित्यिक नव्हते, तर लेखिकेचे आई-वडील जनाबाई आणि गंगाधर शेषराव घुगे, काका-काकू नंदा आणि जनार्दन शेषराव घुगे, बहिणी मनीषा ढाकणे व विद्या मुंडे, तसेच भाचा सार्थक घुगे आणि भाची सरिता घुगे यांच्या हस्ते पुस्तकांचे प्रकाशन झाले.या प्रसंगी बोलताना अलकनंदा घुगे म्हणाल्या, "जन्मतः संघर्षाची प्रेरणा घेऊन ज्यांच्या संघर्षाच्या कथा, कविता मी माझ्या लेखनातून मांडत आले आहे, मांडत राहणार आहे, त्या माझ्या माता-पित्यांच्या ऋणातून उतराई होण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे. शेतकरी आई-वडिलांच्या हातून पुस्तकाचे प्रकाशन व्हावे, ही माझी अनेक दिवसांची इच्छा होती."त्यांनी पुढे सांगितले की, "माझा नवीन कवितासंग्रह 'पाऊस आणि बरंच काही' आणि कथासंग्रह 'अर्धा कोयता' याच्या दुसऱ्या आवृत्तीला वाचकांचा तसाच प्रतिसाद मिळेल अशी आशा आहे."तिफण सखी मंचतर्फे अलकनंदा घुगे यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. गावात, शेतात, आप्तेष्टांच्या उपस्थितीत पार पडलेला हा सोहळा उपस्थितांसाठी भावनिक ठरला. साहित्य आणि मातीचे नाते अधोरेखित करणाऱ्या या उपक्रमाची गावभर चर्चा आहे.

## सत्यशोधक विद्यालयात शिवस्वराज्य दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन



**घोषेगाव (प्रतिनिधी) :** मानव विकास व पुर्ननिर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित, सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन जिल्हा जालना येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनाच्या स्मरणार्थ ६ जून २०२६ रोजी विद्यार्थ्यांच्या मनावर शिवचरित्राचे प्रतिबिंब उमटविणे या उद्देशाने सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शिवराज्यभिषेक दिन हा शिवस्वराज्य दिन म्हणून साजरा करण्यात आला यानिमित्ताने विद्यालयात प्रमुख पाहुणे म्हणून गोषेगाव येथील योगेश मोहिते उपस्थित होते तर अध्यक्ष स्थानी निलेश कंकाळ होते . याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आली. सूत्रसंचालन नंदकिशोर मापारी यांनी तर आभार पंजाब कांबळे यांनी मांडले. प्रास्तविक सागर हिवरे यांनी केले. विजय कोलते, संदीप चंद्रे, सुमित श्रीवास्तव, दिनेश जाधव यांनी त्यांच्या जीवन चरित्र पट सांगितला. यशस्वी होण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य सुनील वाकेकर साहेब व संस्थेच्या सचिव श्रीमती जयश्री बनकर मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.यावेळी विद्यार्थी व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903



१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०७ जून २०२६


## कर्माचा हिशोब

उगाच कुणाला कमी समजून
हसत पुढे जाऊ नका,
वेळेच्या शांत प्रवाहाला
कमजोरी समजू नका।

आज जरी हात रिकामे असले
तरी मन श्रीमंत असतं,
कष्टाच्या कोरड्या भाकरीतही
समाधानाचं चांदणं वसतं।

ज्यांनी पैशाच्या गर्वामध्ये
माणुसकी विकली बाजारात,
त्यांच्या महालांच्या भिंती रडतात
रात्रंदिवस अंधारात।

खोट्या यशाच्या मिरवणुका
दोन दिवसच चालतात,
सत्याच्या साध्या पाऊलखुणा
शतकानुशतकं बोलतात।

ज्यांनी इतरांच्या स्वप्नांना
निर्दयीपणे मोडलं होतं,
त्यांच्याच डोळ्यांमध्ये आता
हरवलेलं आकाश रडतं।

काळ फार शांत असतो
पण तो सगळं पाहत असतो,
कुणाच्या मनात किती विष आहे
हिशोब ठेवत बसतो।

आज ज्यांच्या सभोवताली
चमच्यांची गर्दी असते,
उद्या वादळ आल्यानंतर
तीच गर्दी पाठमोरी दिसते।

म्हणून माणूस मोठा व्हावा
तर मनाने मोठा व्हावा,
पैशाने उंच झालेला डोंगर
एका क्षणात कोसळावा।

आईच्या डोळ्यांतील पाणी
कधी वाया जात नसतं,
वडिलांच्या घामाचं देणं
आयुष्यभर फिटत नसतं।

ज्यांनी वृद्ध हातांना
एकटेपणाची शिक्षा दिली,
त्यांच्या सुखाच्या दाराशी
वेदनांनी रांगोळी काढली।

कर्माचा हिशोब मित्रांनो
खूप कठोर लिहिला जातो,
खोटेपणाच्या प्रत्येक पावलाला
उत्तर इथेच दिलं जातं।

म्हणून कुणाला फसवून
क्षणिक आनंद मिळवू नका,
दुसऱ्यांच्या अश्रूंवरती
स्वप्नांचे महाल बांधू नका।

कारण वेळ जेव्हा फिरते
राजाही भिकारी होतो,
आणि सत्यासाठी जगणारा
सामान्य माणूसही इतिहास होतो।

**- डॉ. बाळासाहेब लिहिणार**

## वाघोबा वाघोबा

वाघोबा वाघोबा
भारी तुझा तोरा
डरकाळीने दणाणतो
आसमंत सारा

लहान मोठे प्राणी
घाबरतात तुला पाहून
जीव मुठीत घेऊन
पळतात जोर लावून

काळे पट्टे शोभती
पिवळ्या गडद रंगावर
मोठ्ठी डरकाळी फोडून
येतोस सरळ अंगावर

धिप्पाड शरीर असून
पाण्यात पोहतोस छान
राष्ट्रीय प्राणी म्हणून
मिळाला बहुमान

वाघोबा तुझ्यामुळे
जंगलाची वाढते शान
संवर्धन तुझे करण्याचे
मानवास कुठे भान?



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## चल मित्रा झाड लावू

स्वार्थ सोडून सर्वांनी,
एक विचार करावे.
निसर्गाच्या भाळामध्ये
रंग हिरवे भरावे. १

झाड हिरवे हिरवे,
खुप शोभून दिसते.
थकलेल्या माणसांना
गोष्टी सांगत बसते. २

निसर्गाच्या रक्षणार्थ
चल मित्रा सारे धावू
चिमणीच्या खोप्यासाठी,
मित्रा एक झाड लावू. ३

स्वार्थ सोडून सर्वांनी,
सदा आनंद वाटावे.
निसर्गाच्या सानिध्यात,
गोड संसार थाटावे. ४

चला आता माणसांनो,
शोधू निसर्गात सुख.
झाडाविना सर्वांनाच
मिळणार आहे दुःख. ५

**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# महानगरपालिकेतर्फे सुखना नदी येथे वृक्षारोपणाचे कार्यक्रम संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका छत्रपती संभाजी नगर यांच्यावतीने चिकलठाणा परिसरातील सुकना नदी या ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती महानगरपालिकेचे महापौर समीर राजूरकर विभागीय आयुक्त जी श्रीकांत महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे उपस्थित होते सदर कार्यक्रमासाठी महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा या शाळेचे विद्यार्थी व शिक्षक ही उपस्थित होते शाळेचे मुख्याध्यापक संजय मडके, जाहेदखान पठाण सर्जेराव वाघ वसंत राठोड अर्चना भारद्वाज संदीप चव्हाण अरुणा फुलंब्रीकर वाघ मामा सुनिता साबळे रवींद्र खापे तसे शाळेतील विद्यार्थी संतोष गिरी जीवन मगरे राधेश्याम गिरी अश्विन कुमार कांबळे बरोदे आरती सोळंके व इतर विद्यार्थी उपस्थित होते

# जयहिंद डिफेन्स करिअर अकॅडमीच्या विद्यार्थ्यांची सैन्य व पोलीस सेवेत घवघवीत कामगिरी



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** ग्रामीण भागातील युवकांना संरक्षण दल व पोलीस सेवेत करिअर घडविण्यासाठी मार्गदर्शन करणाऱ्या जयहिंद डिफेन्स करिअर अकॅडमी, जिंतूरच्या विद्यार्थ्यांनी विविध सेवांमध्ये निवड मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशामुळे अकॅडमीसह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.भारतीय सैन्यात अजय राठोड (पारडी), गोविंद पांचाळ (देवगाव), बालाजी बोरकर (पिंपळा), रोहन वानरे (वालूर), शिवाजी शिंदे (गोंडाळा), भारत डोईफोडे (बामणी), रवी कांबळे (दामपुरी), करण निरस (पडेगाव) तसेच गणेश पोंडार (गोंडाळा) यांनी यश मिळवत देशसेवेची संधी प्राप्त केली आहे. तसेच माऊली रोकडे (वालूर) यांची महाराष्ट्र सुरक्षा बल (एमएसएफ) मध्ये निवड झाली आहे.अकॅडमीचे माजी विद्यार्थी गजानन रोकडे यांनी पोलीस विभागात १२ वर्षे सेवा बजावल्यानंतर विभागीय पदोन्नतीद्वारे पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पद मिळविले आहे. तसेच सय्यद जिन्नत हे पोलीस विभागात कार्यरत असून योगिता गोरे या नागपूर शहर पोलीस दलात सेवा बजावत आहेत.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल कल्याण देशमुख, राहुल देशमुख आणि गिरीश वट्टमवार, अशोक शिंदे,पत्रकार महेश देशमुख यांनी त्यांचा हार घालून सत्कार केला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत ग्रामीण भागातील युवकांनी संरक्षण दल व पोलीस सेवेकडे करिअर म्हणून पाहावे, असे आवाहन करण्यात आले.जयहिंद डिफेन्स करिअर अकॅडमीचे संचालक पांडुरंग उबाळे पाटील (माजी सैनिक) यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे परिसरातील अनेक युवकांना सैन्य व पोलीस सेवेत प्रवेश करण्याची प्रेरणा मिळत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०७ जून २०२६


## जागतिक पर्यावरण दिनी आपलं छत्रपती संभाजीनगर , हरीत संभाजीनगर - स्वच्छ संभाजीनगर च्या उपक्रमाचे मा.अतुल सावे (कॅबिनेट मंत्री) यांच्या हस्ते उद्घाटन



**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून महानायक सोशल वेलफेअर फाऊंडेशन तर्फे आपलं छत्रपती संभाजीनगर, हरीत संभाजीनगर - स्वच्छ संभाजीनगर या महत्वपूर्ण उपक्रमाचे उद्घाटन मा.अतुल सावे (मंत्री , इतर बहुजन कल्याण) यांच्या हस्ते झाले.यावेळी सभापती अनिल मकरिये , नगरसेवक शिवाजी दांडगे , संस्थेचे सदस्य अभिषेक सांगळे , प्रा.अजाबराव मनवर , स्वामीनंद बनसोडे , शुभम नरवडे यांची प्रमुख उपस्थिती होती. महानायक सोशल वेलफेअर फाऊंडेशनचे संस्थापक प्रा.सागर चाबुकस्वार यांनी या उपक्रमाची माहिती देताना सांगितले की , पर्यावरणाचं संरक्षण करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे आणि जबाबदारी सुद्धा आहे. फक्त वृक्षारोपण करुन चालणार नाही, तर त्यांची जोपासना देखिल आपण केली पाहीजे. आपण ज्या परिसरात राहतो , तो परीसर जर स्वच्छ असेल .तर आपले आरोग्य देखिल चांगले राहते. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर चे नागरीक म्हणून आपण आपले शहर सुंदर व हरित शहर म्हणुन याची गणना झाली पाहिजे आणि आपल शहर हे ऐतिहासिक शहर आहे. देश - विदेशातील नागरिकांना सध्याच्या परिस्थितीत ज्यावेळेस ते आपल्या शहरात येतात.तेव्हा इथली अवस्था पाहून ते नाव ठेवतात. परंतू आपणही हे लक्षात घेतलं पाहिजे की आपण हि आपल्या शहराला एवढं सुंदर बनवू की , जगाला हेवा वाटला पाहिजे आणि नक्कीच हे आपण पूर्ण करु शकतो . त्यासाठी छत्रपती संभाजीनगर च्या प्रत्येक नागरिकाने या मोहीमेत सहभागी झालं पाहीजे आणि शेजारच्यालाही सहभागी करून घेतलं पाहीजे. आपला परिसर स्वच्छ ठेऊन आपण या मोहिमेत सहभागी होऊ शकतात.काय आहे ही मोहीम ? आपलं छत्रपती संभाजीनगर, हरीत संभाजीनगर - स्वच्छ संभाजीनगर या मोहिमेअंतर्गत खालील गोष्टी राबविल्या जाणार आहेत. ●भव्य स्वच्छता अभियान ● वेस्ट टू बेस्ट सेंटर ● कागदी व कापडी पिशवी केंद्र ●स्वच्छ प्रभाग उपक्रम ●विशेष जनजागृतीपर व्याख्यान, पथनाट्य , संवादमाला , निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा इ. कार्यक्रम घेतले जाणार.आपण या मोहिमेत कसे सहभागी होऊ शकतात :- ● सोसायटीतील गार्डन मध्ये वृक्षारोपण करा.●आपण राहतो त्या भागात स्वच्छतेविषयी जनजागृती करावी.●किमान पाच व्यक्ती या मोहिमेत जोडावी.●स्वत:च्या घराच्या बाजुला जिथे जागा असेल तिथे रोपटे लावावे.●प्लास्टिकच्या बॅग ऐवजी कापडी किंवा कागदी पिशवीचं वापरावी. कोणी वापरत असेल त्याला समजावून सांगावे.●गरज नसेल तिथे गाडीचा वापर टाळावा . त्या ऐवजी सायकलचा वापर वाढवा ज्यामुळे प्रदूषणाला देखिल आळा बसेल.आपण आपल्या या छत्रपती संभाजीनगर सुंदर शहर बनवण्याच्या मोहिमेत सहभागी होऊयात. आपल्या कार्याचा सन्मान म्हणुन संस्थेकडून 'ग्रीन पर्सन' प्रमाणपत्र देखिल मिळणार आहे.त्यासाठी आवर सीएसएन , ग्रीन सीएसएन- क्लीन सीएसएन या सोशल मिडीयाच्या अकांऊट वर फोटोस टाकावे.असे आवाहन संस्थेकडून करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर शहर सुंदर करण्यासाठी महानायक सोशल वेलफेअर फाऊंडेशन तर्फे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जी मोहीम हाती घेतली आहे.ती खरचं अभिमानास्पद आहे. प्रत्येक नागरिकाने यात स्वत:हून सहभाग घेऊन ही मोहीम यशस्वी करुयात असे आवाहन मा.अतुल सावे (मंत्री , इतर बहुजन कल्याण) यांनी केले आहे.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत



बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903


## मित्रा, तू फक्त लढत रहा

मनसखा माझा
सांगत असे मला
तूच आहे तुझा
कुणी नाही तुझा

मित्रा, तू फक्त लढत रहा
एक-एक पायरी चढत रहा

व्हायचं ते होत राहिलं
तुझ्या हातात काय आहे ?
तुझ्या हातात जे आहे
ते-ते तू करत रहा

मित्रा, तू फक्त लढत रहा
एक-एक पायरी चढत रहा

सशाच्या वेगाबरोबर
कासवाचाही वेग असू दे
गती कशीही असो
सातत्य तेवढं ठेवत रहा

मित्रा, तू फक्त लढत रहा
एक-एक पायरी चढत रहा

आडवा येऊ दे कुचितपणा
जळपटपणाला जाळूदे सारं
कितीही कुणी कळ लावो
निंदक असो घरात आपल्या

मित्रा, तू फक्त लढत रहा
एक-एक पायरी चढत रहा

परिणाम होईल तो होईल
हसत-भोगत चालत रहा
थांबू नको तू फक्त
यश समोर तुझ्या

मित्रा, तू फक्त लढत रहा
एक-एक पायरी चढत रहा

न पटणार, या कानाचं त्या कानाने
सोडत मागे पुढे चालत रहा
उशीर तेवढा होईल फक्त
नियती देईल तुझं तुला

मित्रा, तू फक्त लढत रहा
एक-एक पायरी चढत रहा

**- लक्ष्मण वाल्डे**

## उभ्या जन्माची देवा

उभ्या जन्माची देवा लई हाडहाड झाली
वाटेवर दगडांची रांग स्वागताला आली

कशी कुतरघाई ही भाळी सटीने लिहिली
फक्त घामाच्या धारांनी कुठं गंगा रे वाहिली

डोईवरच्या ओझ्याने कणा मोडला पाठीचा
उरामधे लपलेला दिवा तापला आशेचा

सोनशेती पिकविण्या केली काळजाची माती
पदरात तरी देवा का रे उपासाच्या राती

जगण्याच्या रणांगणी जिंकताना रे हरलो
तरी साऱ्या वादळांना आता पुरून उरलो

**ज्ञानेश्वर गायके,कन्नड**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०७ जून २०२६


## जिंतूरात अवैध गुटखा विक्रीवर एलसीबीची धडक कारवाई; दोघांविरुद्ध गुन्हे दाखल



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेल्या गुटखा व सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध विक्रीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) जिंतूर शहरात धडक कारवाई करत दोघांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईत मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला.स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार पांडुरंग तुपसुंदर यांच्या फिर्यादीवरून रामप्रसाद नगर, बलसा रोड परिसरातील अमोल शिवानंद थिटे (वय २६) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दुपारी सुमारे २.४५ वाजता आरोपीच्या घराशेजारील पत्र्याच्या शेडवर छापा टाकून प्रतिबंधित गुटखा जप्त केला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक नामदेव मद्दे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.दरम्यान, दुसऱ्या कारवाईत पोलीस शिपाई राम पोळ यांच्या फिर्यादीवरून फजल खान खलील खान पठाण (वय ३२, रा. पठाण मोहल्ला, जिंतूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सायंकाळी सुमारे ५.१० वाजता आरोपीच्या घराशेजारील पडके घर येथे छापा टाकण्यात आला. या ठिकाणीही प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला असून पुढील तपास पोलीस कर्मचारी महेश गजभार करीत आहेत.पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. कारवाईत पोलीस हवालदार सिद्धेश्वर चाटे, राम पोळ, नामदेव डूबे, उमेश चव्हाण, मुकेश बुधवंत आणि पांडुरंग तुपसुंदर यांनी सहभाग घेतला.शहरात प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीविरोधात अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.


जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-

२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-

३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-

४. शुभेच्छा जाहिरात ६००/-


## ग्वाल्हेरमध्ये ३५२ वा राज्याभिषेक दिन उत्साहात साजरा



**दौलताबाद (जावेद अहमद) :** महाराष्ट्र भर राज्याभिषेक दिन म्हणून साजरे करण्यात येते ३५२ वा राज्याभिषेक दिन आय आय टी टी एमसंस्थान व DOT महाराष्ट्र पर्यटन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि ०६ जून शनिवारी रोजी ग्वाल्हेर येथे साजरे करण्यात आलेDOT महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या वतीने मध्यप्रदेश ग्वाल्हेर येथे महाराष्ट्र पर्यटन उपसंचालक विजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यटन मार्गदर्शक गाईड ट्रेनिंग प्रोग्राम आयोजित करण्यात येत आहे प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र तुन अनेक विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेकार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी संस्थांचे डॉ चंद्रशेखर बरवा हे होते तर प्रमुख उपस्थितीत प्राध्यापक रामेश्वर कोगवा , डॉ विनयकुमार,विशाल खिशल,छत्रपती संभाजीनगर जिल्हा पर्यटक अधिकारी शेख अजिमोदिन हे होतेविध्यार्थीनी पारंपरिक वेशभूषेत स्वागत केले मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व कार्यक्रमाचे सुरुवात करण्यात आलीविद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनी व त्यांच्या जीवनावर आधारित पोवाडे, कविता, नाटक सादर केलेडॉ चंद्रशेखर बरवा यांनी सांगितले आमच्या जीवनातील असमर्णीय क्षण असून इतिहासात प्रथमच आमच्या संस्थेत छत्रपती शिवाजी महाराज यांचे राज्याभिषेक दिन साजरा झाला आहेसंस्थांच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले असून छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा भेट म्हणून दिली आहेसर्वांनी मिळून गड किल्ले संवर्धन व साफ सफाई करण्यासाठी शपथ घेतलीयावेळी प्रशिक्षित गाईड व संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते

## शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त उमरगा येथे ५१ शिवभक्तांचे रक्तदान



**उमरगा (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिषेक करण्यात आला. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ५१ शिवभक्तांनी रक्तदान केले. श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त उमरगा शहरासह तालुक्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिषेक करण्यात आला. शिवगर्जना परिवाराच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ५१ शिवभक्तांनी रक्तदान केले. सकाळी प्रविण शिंदे हस्ते सर्वप्रथम पुतळ्यास अभिषेक करण्यात आला. यावेळी आमदार प्रवीण स्वामी, जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा उषाताई गायकवाड, प्रा. सुरेश बिराजदार, नगराध्यक्ष किरण गायकवाड, बाळासाहेब माने, माजी नगरसेवक विक्रमबापू बिराजदार, बाजार समितीचे माजी सभापती रणधीर पवार, नगरसेवक सचिन जाधव, शरद पवार, नगरसेविका दिपाली विक्रमबापु बिराजदार, प्रा. सचिन शिंदे, राहुल शिंदे, विजयकुमार नागने, अभिषेक औरादे, गोविंद पवार, भीमा स्वामी, नेताजी कवठे, सुनील साळुंके, विकास सुर्यवंशी, नितीन सुर्यवंशी, प्रविण कोराळे, साई विक्रमबापू बिराजदार, शहाजी येळीकर, विशाल शिंदे, राया चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सिंहगर्जना परिवाराचे प्रमुख प्रेमा शिंदे, प्रा. सचिन शिंदे, राकेश कवाळे, सचिन शिंदे, अरुण कुंभार, निखिल बिराजदार, अभय जोगी, वेदांत दूधभाते, आंबांना दूधभाते, संकेत हळेखेडकर आदीसह शिवभक्तांनी परीश्रम घेतले.सोबत शिवराज्याभिषेकदिनानिमित्त नगरसेविका सौ. दिपाली विक्रमबापु बिराजदार यांनी रक्तदान केले. यावेळी जिपच्या उपाध्यक्षा उषाताई गायकवाड, नगराध्यक्ष किरण गायकवाड, विक्रम बापू बिराजदार, शरद पवार, सचिन शिंदे, विकास सुर्यवंशी, साई बिराजदार आदी..

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०७ जून २०२६

# सुरक्षित अन्नातून आरोग्यपूर्ण जीवन - डॉ. राजेंद्र बगाटे




मानवी जीवनाच्या अस्तित्वासाठी अन्न ही सर्वात मूलभूत गरज आहे. अन्नाशिवाय जीवनाची कल्पनाही करता येत नाही. परंतु केवळ अन्न उपलब्ध असणे पुरेसे नाही, तर ते अन्न सुरक्षित, स्वच्छ, पौष्टिक आणि मानवी आरोग्यासाठी हितकारक असणे अत्यंत आवश्यक आहे. आधुनिक युगात अन्न उत्पादन, प्रक्रिया, साठवणूक आणि वितरणामध्ये प्रचंड वाढ झाली आहे. जागतिकीकरणामुळे अन्न एका देशातून दुसऱ्या देशात सहज पोहोचू लागले आहे. या प्रगतीमुळे अन्नाची उपलब्धता वाढली असली तरी त्याचबरोबर अन्न सुरक्षेच्या समस्या देखील अधिक गंभीर झाल्या आहेत. रासायनिक भेसळ, कीटकनाशकांचे अवशेष, अस्वच्छ हाताळणी, अयोग्य साठवणूक आणि अन्नजन्य आजारांचे वाढते प्रमाण यामुळे मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. या पार्श्वभूमीवर जगभरात अन्न सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी आणि सुरक्षित अन्नाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी ७ जून रोजी 'जागतिक अन्न सुरक्षा दिन' साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिकता नसून सुरक्षित अन्न हा प्रत्येक मानवाचा मूलभूत हक्क आहे, ही जाणीव करून देणारी एक व्यापक जागतिक चळवळ आहे.जागतिक अन्न सुरक्षा दिनाची सुरुवात संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुढाकारातून झाली. डिसेंबर २०१८ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने ७ जून हा दिवस 'जागतिक अन्न सुरक्षा दिन' म्हणून घोषित केला आणि २०१९ पासून तो जगभर साजरा केला जाऊ लागला. या उपक्रमामध्ये संयुक्त राष्ट्रसंघाची अन्न व कृषी संघटना आणि जागतिक आरोग्य संघटना या दोन प्रमुख संस्था महत्त्वाची भूमिका बजावतात. या संस्थांचा उद्देश अन्नजन्य आजारांचे प्रमाण कमी करणे, सुरक्षित अन्नाबाबत जागरूकता वाढवणे, अन्न साखळीतील सर्व घटकांची जबाबदारी निश्चित करणे आणि जागतिक सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करणे हा आहे. दरवर्षी या दिनासाठी एक विशिष्ट संकल्पना ठरवली जाते आणि त्या अनुषंगाने शैक्षणिक संस्था, सरकारी यंत्रणा, अन्न उद्योग आणि सामाजिक संस्था विविध उपक्रम राबवतात.अन्न सुरक्षा म्हणजे अन्नामध्ये कोणतेही हानिकारक जैविक, रासायनिक किंवा भौतिक घटक नसणे आणि ते मानवी सेवनासाठी पूर्णपणे सुरक्षित असणे. अन्नामध्ये सूक्ष्मजीव जसे की बॅक्टेरिया, विषाणू, बुरशी आणि परजीवी असू शकतात. त्याचप्रमाणे कीटकनाशकांचे अवशेष, जड धातू, कृत्रिम रंग, रासायनिक स्वाद आणि इतर विषारी पदार्थही अन्न दूषित करू शकतात. काही वेळा अन्नामध्ये काच, प्लास्टिक किंवा धातूचे तुकडे यांसारखे परकीय घटकही आढळतात, जे थेट आरोग्यास इजा करू शकतात. अशा दूषित अन्नामुळे अन्नविषबाधा, अतिसार, उलट्या, ताप, यकृताचे विकार, मूत्रपिंडाचे आजार आणि गंभीर संसर्गजन्य आजार उद्भवू शकतात. दीर्घकाळ दूषित अन्नाचे सेवन केल्यास कर्करोगासारखे गंभीर आजारही निर्माण होऊ शकतात.जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार दरवर्षी सुमारे ६० कोटी लोक दूषित अन्नामुळे आजारी पडतात आणि सुमारे ४ लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू होतो. ही आकडेवारी केवळ आकडे नसून मानवजातीसमोरील गंभीर आरोग्य संकटाचे प्रतीक आहे. विशेषतः लहान मुले, गर्भवती महिला, वृद्ध व्यक्ती आणि कमकुवत प्रतिकारशक्ती असलेले लोक या समस्येमुळे अधिक प्रभावित होतात. अन्नजन्य आजारांमुळे केवळ आरोग्यच नव्हे तर आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थाही प्रभावित होते. आजारी व्यक्ती काम करू शकत नाही, त्यामुळे उत्पादनक्षमता घटते, कुटुंबावर आर्थिक भार वाढतो आणि देशाच्या विकासावर परिणाम होतो.अन्न सुरक्षा ही संकल्पना 'शेतापासून ताटापर्यंत' या संपूर्ण साखळीशी संबंधित आहे. अन्न उत्पादन, प्रक्रिया, साठवणूक, वाहतूक, विक्री आणि सेवन या प्रत्येक टप्प्यावर सुरक्षितता राखणे आवश्यक आहे. शेतीच्या टप्प्यावर रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा अतिरेकी वापर झाल्यास त्यांचे अवशेष पिकांमध्ये राहतात. कापणीनंतर अन्नाची योग्य साठवणूक न झाल्यास बुरशी आणि जीवाणूंची वाढ होते. वाहतुकीदरम्यान स्वच्छतेचा अभाव आणि तापमान नियंत्रण नसेल तर अन्न खराब होते. अन्न प्रक्रिया उद्योगांमध्ये अस्वच्छता असल्यास मोठ्या प्रमाणावर अन्न दूषित होऊ शकते. शेवटी घरगुती पातळीवर अन्न हाताळताना निष्काळजीपणा झाल्यास आरोग्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे संपूर्ण अन्न साखळीतील प्रत्येक घटकाची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची आहे.भारतात अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण ही प्रमुख संस्था कार्यरत आहे. २००६ च्या अन्न सुरक्षा आणि मानके कायद्याअंतर्गत ही संस्था अन्न उत्पादन, प्रक्रिया, साठवणूक, वितरण आणि विक्री यांचे नियमन करते. ही संस्था अन्नासाठी मानके निश्चित करते, तपासण्या करते, परवाने देते आणि जनजागृती मोहीम राबवते. 'ईट राईट इंडिया' सारख्या मोहिमांद्वारे नागरिकांना सुरक्षित आणि संतुलित आहार घेण्यास प्रोत्साहित केले जाते. तरीही देशात अन्न भेसळीची समस्या गंभीर आहे. दूध, तूप, तेल, मसाले, मिठाई, फळे आणि इतर पदार्थांमध्ये भेसळ केल्याच्या घटना वारंवार घडतात. अधिक नफा मिळवण्यासाठी काही व्यापारी स्वस्त व घातक पदार्थ अन्नामध्ये मिसळतात, जे आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक ठरते.अन्न भेसळीचे परिणाम केवळ तात्काळ आजारांपुरते मर्यादित नसून दीर्घकालीन आरोग्य समस्यांना कारणीभूत ठरतात. कृत्रिम रंग आणि रसायने यकृतावर परिणाम करतात, डिटर्जंटयुक्त दूध मूत्रपिंडावर परिणाम करते, तर रासायनिक मसाले कर्करोगाचा धोका वाढवतात. त्यामुळे अन्न भेसळीविरोधात कठोर कायदे, नियमित तपासणी आणि कठोर शिक्षा आवश्यक आहे. त्याचबरोबर ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.ग्राहकांची भूमिका अन्न सुरक्षेमध्ये अत्यंत महत्त्वाची आहे. ग्राहकांनी अन्न खरेदी करताना उत्पादनाची मुदत, घटकांची माहिती, प्रमाणपत्रे आणि पॅकेजिंग तपासणे आवश्यक आहे. घरामध्ये अन्न तयार करताना स्वच्छता पाळणे अत्यावश्यक आहे. हात धुणे, स्वयंपाकघर स्वच्छ ठेवणे, कच्चे आणि शिजवलेले अन्न वेगळे ठेवणे आणि योग्य तापमानात अन्न शिजवणे या सवयी अंगीकारणे आवश्यक आहे. उरलेले अन्न योग्य प्रकारे साठवणे आणि वेळेत वापरणेही महत्त्वाचे आहे. लहान निष्काळजीपणामुळे मोठे आरोग्य धोके निर्माण होऊ शकतात.जागतिक आरोग्य संघटनेने अन्न सुरक्षिततेसाठी पाच मूलभूत तत्त्वे सांगितली आहेत. स्वच्छता राखणे, कच्चे आणि शिजवलेले अन्न वेगळे ठेवणे, अन्न पूर्णपणे शिजवणे, सुरक्षित तापमान राखणे आणि सुरक्षित पाणी वापरणे ही ती तत्त्वे आहेत. या तत्त्वांचे पालन केल्यास अन्नजन्य आजारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर कमी होऊ शकते.अन्न सुरक्षा आणि पोषण यांचा घनिष्ठ संबंध आहे. सुरक्षित अन्न म्हणजेच पौष्टिक अन्न असे नाही, परंतु दोन्ही परस्परपूरक आहेत. कुपोषणामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते आणि त्यामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढतो. भारतात अजूनही कुपोषण, ॲनिमिया आणि बालकांच्या वाढीतील अडथळे ही गंभीर समस्या आहे. त्यामुळे अन्न सुरक्षा आणि पोषण सुरक्षा दोन्ही आवश्यक आहेत.हवामान बदलाचा अन्न सुरक्षेवर मोठा परिणाम होत आहे. तापमानवाढ, दुष्काळ, पूर आणि अनियमित हवामानामुळे कृषी उत्पादनावर परिणाम होतो. वाढत्या तापमानामुळे अन्नामध्ये सूक्ष्मजीवांची वाढ जलद होते. त्यामुळे अन्न खराब होण्याचा धोका वाढतो. हवामान बदलामुळे कीटकांचा प्रादुर्भाव वाढतो आणि अधिक कीटकनाशकांचा वापर करावा लागतो, ज्यामुळे अन्नामध्ये रासायनिक अवशेष वाढतात. त्यामुळे शाश्वत शेती पद्धती अत्यंत आवश्यक बनल्या आहेत.जागतिकीकरणामुळे अन्न व्यापार मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. एका देशातील अन्न दुसऱ्या देशात सहज पोहोचते. त्यामुळे अन्न सुरक्षेची मानके आंतरराष्ट्रीय स्तरावर समान असणे आवश्यक आहे. कोडेक्स अलिमेंटेरियस कमिशन सारख्या संस्था जागतिक अन्न मानके निश्चित करतात. यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार सुरक्षित आणि पारदर्शक राहतो.कोविड-१९ महामारीच्या काळात अन्न सुरक्षेचे महत्त्व अधिक स्पष्ट झाले. लॉकडाऊनमुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली, परंतु अन्न पुरवठा सुरक्षित ठेवणे हे मोठे आव्हान होते. या काळात स्वच्छता, पॅकेजिंग आणि वितरण यावर विशेष लक्ष देण्यात आले. या अनुभवातून भविष्यातील अन्न प्रणाली अधिक मजबूत आणि लवचिक बनवण्याची गरज अधोरेखित झाली.शहरी भागात स्ट्रीट फूड संस्कृती मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. परंतु अस्वच्छता, दूषित पाणी आणि अयोग्य साठवणूक यामुळे अन्नजन्य आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे खाद्यविक्रेत्यांना प्रशिक्षण देणे, परवाना व्यवस्था मजबूत करणे आणि नियमित तपासणी करणे आवश्यक आहे.तंत्रज्ञानामुळे अन्न सुरक्षेत मोठी क्रांती घडली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन, डिजिटल ट्रॅकिंग आणि आधुनिक प्रयोगशाळा यांच्या मदतीने अन्नाचा संपूर्ण प्रवास ट्रॅक करता येतो. दूषित अन्नाचा स्रोत शोधणे आणि त्यावर तात्काळ कारवाई करणे शक्य झाले आहे.अन्न वाया जाणे ही देखील गंभीर समस्या आहे. जगभरात मोठ्या प्रमाणावर अन्न वाया जाते, तर दुसरीकडे लाखो लोक उपाशी राहतात. अन्नाची नासाडी कमी केल्यास अन्न सुरक्षा सुधारू शकते आणि पर्यावरणावरचा ताण कमी होऊ शकतो. त्यामुळे अन्नाचा योग्य वापर आवश्यक आहे.ग्रामीण भागात शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती आणि सुरक्षित उत्पादन पद्धती याबाबत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. शेतकरी सुरक्षित उत्पादन केल्यास संपूर्ण अन्न साखळी सुरक्षित होते.अन्न सुरक्षा ही शाश्वत विकास उद्दिष्टांशी जोडलेली आहे. भूकमुक्त समाज, उत्तम आरोग्य, शाश्वत शेती आणि जबाबदार उत्पादन यासाठी अन्न सुरक्षा अत्यावश्यक आहे.शेवटी असे म्हणता येईल की जागतिक अन्न सुरक्षा दिन हा मानवजातीला सुरक्षित अन्नाचे महत्त्व समजावून सांगणारा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. सुरक्षित अन्न हे निरोगी जीवनाचे आधार आहे. सरकार, उद्योग, शेतकरी, वैज्ञानिक आणि ग्राहक या सर्वांनी मिळून अन्न सुरक्षा सुनिश्चित करणे आवश्यक आहे. "सुरक्षित अन्न म्हणजे निरोगी जीवन आणि निरोगी जीवन म्हणजे समृद्ध समाज" हा संदेश स्वीकारल्यास आपण अधिक सुरक्षित, सक्षम आणि शाश्वत भविष्य घडवू शकतो.




**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),**
**bagate.rajendra5@gmail.com**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०७ जून २०२६


## मातीतल्या माणूसपणाची रानकवी अरुण थोरात यांची कविता : 'या माणूस मातीने'




मानवी जीवनातील खरे सौंदर्य चकचकीत बंगले, गाड्या आणि पैशात नसून, प्रामाणिक श्रम आणि मातीशी असलेल्या नात्यात आहे, हे रानकवी अरुण थोरात यांची कविता "या माणूस मातिने" वाचल्यावर प्रकर्षाने जाणवते. ही कविता मातीत राबणाऱ्या, घाम गाळणाऱ्या आणि तरीही आपले माणूसपण न सोडणाऱ्या शेतकऱ्याची गाथा सांगते. आज जेव्हा नातेसंबंध, मूल्ये आणि माणुसकी बाजारात विकली जाते, तेव्हा ही कविता आपल्याला आपल्या मुळांकडे परत घेऊन जाते. अरुण थोरात कन्नड तालुक्यातील तिफण परिवारातील एक महत्वाचे कवी आहेत. शेती मातीची ठणक ते शब्दबद्ध करतात. रानकवी म्हणून ही ते ओळखले जातात. या माणूस मातीने ही त्यांची एक नितांत सुंदर अशी कविता आहे.कवितेचा आशय आणि माणूसपणाचे दर्शन कवितेची सुरुवातच कवी करतो ती मातीशी असलेल्या नात्यापासून. "या माणूस मातिने असा लाविला लळा" — या एका ओळीत कवीने शेतकऱ्याचे संपूर्ण जीवन मांडले आहे. ओसाड, कष्टाची जिंदगी त्याला कंटाळवाणी वाटत नाही, कारण मातीवरच्या प्रेमामुळे त्याच्या काळजात तीच जमीन हिरवी दिसते. शहरी माणसाला कोरडी जमीन म्हणजे नापीकपणा वाटतो, पण शेतकऱ्याला तीच जमीन आशेचा स्रोत वाटते. यातून मातीशी असलेली निष्ठा आणि जीवनाबद्दलची सकारात्मक वृत्ती दिसून येते.पुढे कवी शेतकऱ्याच्या बाह्य परिस्थितीचे वास्तववादी चित्रण करतो. "या फाटक्या कपड्यात बेईमानी कधी न दिसली" — फाटके कपडे, झिजले शरीर, पण मनात कपटाचा डाग नाही. दारिद्र्य असूनही त्याची दानत कमी झालेली नाही. आजच्या काळात जिथे माणूस पैशासाठी नीती विसरतो, तिथे हा शेतकरी अधपोटी राहूनही प्रामाणिक राहतो. त्याच्या शरीराची झालर फाटकी असली तरी त्याचे मन कधीही फाटत नाही. हेच खरे माणूसपण आहे."भेगाळल्या पाय टाचांना सहनशीलता कुठून आली" — या ओळीत कवी शेतकऱ्याच्या सहनशीलतेचा गौरव करतो. उन्हातान्हात राबणे, काटे टोचणे, पायाला भेगा पडणे, तरीही कर्तव्यापासून न ढळणे, ही शक्ती त्याला मातीशी असलेल्या नात्यातून आणि कर्तव्याच्या जाणिवेतून मिळते. त्याचा प्रवास कधीच थांबत नाही. तो थांबला तर पिकणार नाही, घर चालणार नाही, म्हणून तो चालत राहतो.कवी पुढे म्हणतो, "या मोडक्या झोपडीत चंद्र सूर्य रोज लोळतो". बाहेरून मोडकी दिसणारी झोपडी, पण आत निसर्गाची शोभा नांदते. आयुष्यातील दुःख आणि दैन्य तो कवडशात जाळून टाकतो. यातून दिसते की भौतिक अभाव असला तरी मनाने श्रीमंत असणारा माणूस कधीही खचत नाही. निसर्ग त्याला कधीही एकटा सोडत नाही. उगवणारा सूर्य त्याला नवीन उमेद देतो आणि मावळणारा चंद्र त्याला विश्रांती."या मळक्या कापडांना झालर घामधारांची" — शेतकऱ्याच्या कपड्यांना घामाची झालर आहे, हीच त्याची खरी रांगोळी आहे. त्याची रोजची श्रम-वारी हीच त्याच्यासाठी पंढरीची वारी आहे. श्रमाला देव मानणारी वृत्तीच त्याला वेगळा बनवते. त्याच्यासाठी शेत हेच मंदिर आणि नांगर हेच देव.शेवटी कवी म्हणतो, "ही रानपाखरे अधपोटी शोधतात दाणे शिबारी". ही माणसे अधपोटी राहूनही कष्ट करतात, पण कधीही दुसऱ्याला फसवण्याचा विचार करत नाहीत. त्यांना माळफासाची काठ दोरी म्हणजे दुसऱ्याच्या गळ्यात फास अडकवण्याची वेळ कधीच आली नाही. यातून माणूसपणाची खरी कसोटी दिसते — संकटातही नीती न सोडणे.ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण ही कविता केवळ व्यक्तीचे चित्रण करत नाही, तर संपूर्ण ग्रामीण जीवनाचे वास्तव उभे करते. कवीने जाणीवपूर्वक "रानपाखरे" हा शब्द वापरला आहे. शेतकरी हा रानातला पक्षी आहे, जो मोकळ्या आकाशाखाली, निसर्गाच्या सान्निध्यात जगतो. त्याचे जीवन काटकसरीचे आहे, पण त्यात एक वेगळीच समृद्धी आहे. कवितेत शहर-ग्राम असा विरोधाभासही दिसतो. शहरात माणूस सुखासाठी धडपडतो, पण समाधान मिळवू शकत नाही. तर गावातला माणूस अभावातही समाधानाने जगतो. कवीने कुठेही तक्रार केलेली नाही, उलट अभिमानाने सांगितले आहे की हेच खरे जगणे आहे.भाषा आणि शैली अरुण थोरात यांची भाषा साधी, सरळ आणि ग्रामीण आहे. "भेगाळले पाय", "मळकी कापडं", "मोडकी झोपडी", "कवडशात जाळतो" यांसारखे शब्दप्रयोग वाचकाच्या डोळ्यासमोर प्रत्यक्ष चित्र उभे करतात. कवितेत अवघड संस्कृतप्रचुर शब्द नाहीत. जी भाषा शेतात बोलली जाते, तीच भाषा कवितेत आली आहे. कवितेची रचना पुनरावृत्तीवर आधारित आहे. प्रत्येक कडवा "या माणूस" ने सुरू होतो. यामुळे एक लय निर्माण होते आणि शेतकऱ्याच्या जीवनाचे वेगवेगळे पैलू हळूहळू उलगडत जातात. कवीने कुठेही करुणा निर्माण करायचा प्रयत्न केलेला नाही. तो दया मागणारा शेतकरी दाखवत नाही, तर अभिमानाने उभा असलेला कष्टकरी दाखवतो.कवितेचे महत्त्व आणि प्रासंगिकता आजच्या उपभोगप्रधान आणि स्पर्धात्मक काळात ही कविता आपल्याला थांबवते आणि विचार करायला लावते. खरे सुख पैशात आहे का, मोठ्या बंगल्यात आहे का, की मनाच्या शांतीत आणि समाधानात आहे? शेतकरी आपल्याला शिकवतो की माणूस प्रामाणिकपणे कष्ट करून आणि जे आहे त्यात समाधानी राहूनच खऱ्या अर्थाने सुखी होऊ शकतो.शेतकरी आत्महत्या, पिकांचे नुकसान, कर्जाचा विळखा यांसारख्या समस्यांनी ग्रामीण महाराष्ट्र होरपळतो आहे. अशा काळात ही कविता शेतकऱ्याला बळ देते. ती सांगते की तुझ्या कष्टाला किंमत आहे, तुझ्या प्रामाणिकपणाला अर्थ आहे. ही कविता केवळ शेतकऱ्यासाठी नाही, तर प्रत्येक माणसासाठी आहे जो जीवनात मूल्ये जपण्याचा प्रयत्न करतो.शाळा-महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमात अशा कवितांचा समावेश होणे गरजेचे आहे. कारण ती मुलांना मातीशी नाळ जोडायला शिकवते. शहरात वाढणारी पिढी शेती आणि शेतकऱ्यापासून दुरावते आहे. अशा कविता त्या दरीला कमी करतात.समारोप "या माणूस मातिने" ही कविता शब्दांमधून मातीचा गंध आणि माणसाचा आत्मा दोन्ही टिपते. रानकवी अरुण थोरात यांनी अल्पशब्दांत शेतकऱ्याच्या जीवनाचे गौरवगान केले आहे. मातीशी बांधले हे माणूसपणच खरे धन आहे, हेच कवीचे अंतिम सांगणे आहे. ही कविता वाचल्यानंतर आपल्याला आपल्या मुळांची, कष्टाची आणि माणुसकीची आठवण होते. ती आपल्याला शिकवते की पैशाने श्रीमंती येते, पण माणूसपणाने मोठेपणा येतो. म्हणूनच ही रचना केवळ साहित्यकृती नसून, जीवनाकडे पाहण्याची एक दृष्टी देते आणि आजही तितकीच प्रेरणादायी आहे. रानकवी यांच्या माणसातील माणूसपणाच्या दिशेने निघालेल्या माती व मानसांशी ईमानी राहून लेखण करणाऱ्या निष्ठावंत लेखणीस खूप खूप शुभेच्छा !

**- डॉ. शिवाजी हुसे**

